# जिल्हा वार्षिक योजना - विशेष घटक योजना (SCP)

अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना ७५% अनुदानावर
१० शेळया व १ बोकड गट पुरवठा करणे

## 🐐 शेळी गट: १० शेळया + १ बोकड 🐐

केवळ ७५% अनुदानावर संपूर्ण गट!

**तुमचा फायदा: मांस उत्पादन व आर्थिक उत्पन्न वाढ!**

## 🎯 योजनेचा उद्देश आणि लाभ

**अधिक मांस उत्पादनाकरीता शेळीपालन व्यवसायास प्रोत्साहन व चालना देणे** तसेच *शेळीपालन व्यवसायामधून पशुपालकांचा आर्थिक स्तर उंचावण्याकरीता* सादर योजना राबवण्यात येत आहे.

- **शेळीपालन व्यवसायाद्वारे पशुपालकांचे आर्थिक उत्पन्न वाढविणे**
- अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना **७५% अनुदानावर** स्थानिक जातीच्या शेळी गटाचा पुरवठा
- उर्वरित **२५% हिस्सा** लाभार्थीने स्वतः उभारणे
- **१० शेळया व १ बोकड** यांचा संपूर्ण गट

## 🎯 खर्चाचा तपशील

| अ.क्र. | बाब | शासकीय अनुदान | लाभार्थी हिस्सा | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| 1 | १० शेळया खरेदी (प्रति शेळी रु. ६,०००/-) | रु. ४५,०००/- | रु. १५,०००/- | रु. ६०,०००/- |
| 2 | १ बोकड खरेदी (रु. ८,०००/-) | रु. ६,०००/- | रु. २,०००/- | रु. ८,०००/- |
| 3 | तीन वर्षांचा विमा (१२.७५% + १८% GST) | रु. ७,६७३/- | रु. २,५५८/- | रु. १०,२३१/- |
| एकूण | संपूर्ण खर्च | रु. ५८,६७३/- | रु. १९,५५८/- | रु. ७८,२३१/- |

## 🎯 पात्रता निकष

१) दारिद्य रेषेखालील लाभार्थी

२) अत्यल्प भूधारक शेतकरी
(१ हेक्टर पर्यंतचे भूधारक)

३) अल्प भूधारक शेतकरी
(१ ते २ हेक्टर पर्यंतचे भूधारक)

४) सुशिक्षित बेरोजगार
(रोजगार व स्वयंरोजगार केंद्रात नोंद असलेले)

५) महिला बचत गटातील लाभार्थी
(अंक १ ते ४ मधील)

## आवश्यक कागदपत्रे

### अनिवार्य कागदपत्रे:

- फोटो ओळखपत्राची सत्यप्रत
- सातबारा
- ८-अ उतारा
- अपत्य दाखला / स्वघोषणा पत्र
- आधारकार्ड
- ७-१२ मध्ये नाव नसल्यास संमती पत्र
- अनुसूचित जाती दाखल्याची सत्यप्रत
- रहिवासी प्रमाणपत्र
- दारिद्य रेषेखालील प्रमाणपत्र
- बँक खाते पासबुक सत्यप्रत
- रेशनकार्ड / कुटुंब प्रमाणपत्र

- दिव्यांग दाखला (असल्यास)
- बचत गट सदस्य प्रमाणपत्र
- वय - जन्मतारखेचा पुरावा
- शैक्षणिक पात्रतेचा दाखला
- रोजगार नोंदणीकार्डची सत्यप्रत
- प्रशिक्षण प्रमाणपत्र (असल्यास)

## 🎯 अर्ज करण्याची प्रक्रिया

### 🌐 ऑनलाइन योजना

अर्ज करण्यासाठी भेट द्या: **http://ah.mahabms.com**